म. ग्रं. सं. ठाणें

विषय
भा. व्याकरण

संग्रहालय क्रमांक
22
१०२

लेखक

सन

पुस्तकाचें नांव व्याकरण चंद्रिका
अथवा व्याकरण पाठमाला

22
१०२

# व्याकरण चंद्रिका बोध अथवा व्याकरण पाठमाला

(भाषा व्याकरण)

१८८५
म. ग्रं. सं. ठाणें
भाषा व्याकरण
नं. 902
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें सन १८

मराठी
[illegible]ा चंद्रिका बोध, अथवा
[illegible]पाठमाला. भाग २ रा.
क्रियापद.

१ क्रियापदाच्या मूळच्या रूपास धातु ह्मणतात; जसें:—खा, जा, नीज, इ०.

२ धातूला प्रत्यय लागून क्रियापद होतें; जसें:—खातो, जातो, निजतो, इ०.

३ क्रियापदाच्या आठ जाती आहेत:—अर्थावरून पांच:—सकर्मक, अकर्मक, उभयविध, भावकर्तृक आणि सहाय: व रूपावरून तीन:—शक्य, प्रयोजक, आणि गौण ( अथवा सिद्ध ).

४ क्रियेचा व्यापार ज्या पासून निघतो तो कर्त्ता; जसें:—रामा जातो; या उदाहरणांत जाणें या क्रियेचा व्यापार 'रामा' पासून निघतो, ह्मणून 'रामा' हा कर्त्ता होय.

५ क्रियेचा व्यापार कर्त्त्या पासून निघून ज्यावर घडतो तें कर्म; जसें:—रामा वाघ मारितो; या वाक्यांत मारणें या क्रियेचा व्यापार 'रामा' या कर्त्त्या पासून निघून 'वाघ' या शद्बावर घडतो म्हणून 'वाघ' हे कर्म होय.

६ कर्त्त्याची विभक्ति प्रथमा किंवा तृतीया असते; परंतु कोठें कोठें चतुर्थी असते.

७ कर्माची विभक्ति प्रथमा किंवा द्वितीया असते.

८ क्रियापदाला **कोण** किंवा **कोणीं** असा प्रश्न करून उत्तर येईल तो **कर्त्ता** समजावा.

९ क्रियापदाला **काय** किंवा **कोणास** असा प्रश्न करून उत्तर येईल तें कर्म समजावें.

☞ **टीप**--रामा वाघ मारितो; **कोण** मारितो? उत्तर--'-**रामा**' ह्मणून '**रामा**' मारितो या क्रियापदाचा **कर्त्ता** होय; आणि **काय** मारितो? उत्तर--'**वाघ**' ह्मणून '**वाघ**' हें मारितो या क्रियापदाचें **कर्म**. गोपाळानें चोरास पाहिलें; कोणीं पाहिलें? उत्तर '**गोपाळानें**' ह्मणून '**गोपाळानें**' हा **कर्त्ता**; **कोणास** पाहिलें? उत्तर '**चोरास**,' ह्मणून '**चोरास**' हें **कर्म** होय.

१० ज्याचा अर्थ कर्मा वांचून पूर्ण होत नाहीं किंवा ज्यास कर्म असतें तें **सकर्मक क्रियापद**; जसें:--रघुनाथ पुस्तक वाचितो, या वाक्यांत '**पुस्तक**' हें कर्म नसलें तर '**वाचितो**' या क्रियापदाचा अर्थ पूर्ण होणार नाहीं, ह्मणून '**वाचितो**' हें सकर्मक क्रियापद होय.

११ सकर्मक क्रियापदावरून **सकर्मककर्त्तरि**, **कर्मणी**, आणि **सकर्मकभावे** हे प्रयोग होतात.

१२ ज्याचा अर्थ कर्मा वांचून पूर्ण होतो ह्मणजे कर्त्याचा व्यापार कर्त्यावरच असतो, व ज्याला कर्म नसतें तें **अकर्मक क्रियापद**; जसें:--गोविंदा बसतो. यांत बसण्याचा व्यापार गोविंदावरच राहतो--ह्मणजे बसतो या क्रियापदाचा अर्थ कर्मा वांचून पूर्ण होतो, ह्मणून बसतो हें अकर्मक क्रियापद होय.

स. भा. व्या १०७



☞ टीप--गोविंदा बसतो; यांत कोण बसतो? 'गोविंदा" हा कर्त्ता; परंतु काय बसतो? याचें उत्तर निघत नाहीं ह्मणून "बसतो' यास कर्म नाहीं; यावरून तें अकर्मक क्रियापद होय.

१३ अकर्मक क्रियापदावरून **अकर्मक कर्त्तरि** व **अकर्म भावे** हे प्रयोग होतात.

१४ कित्येक क्रियापदें सकर्मक असून अकर्मक हीं असतात तीं **उभयविध** क्रियापदें होत; जसें:--उघडणें, भरणें, भाजणें, उदाहरण:--तो घर उघडितो हें सकर्मक याचें अकर्मक त्याचें घर उघडतें.

१५ **सकर्मक** व **अकर्मक**--ज्यास कर्म असतें तें **सकर्मक** व ज्यास कर्म नसतें तें **अकर्मक** क्रियापद जाणावें.

☞ टीप--ज्यास भविष्य काळीं, तृतीयपुरुषीं 'ईल' हा प्रत्यय लागतो तें **सकर्मक** क्रियापद व 'एल' हा प्रत्यय लागतो तें **अकर्मक** क्रियापद जाणावें; जसें:-करील, लिहील, मारील, इ०. सकर्मक क्रियापदें; व फुटेल, बसेल, अडकेल, इ०. अकर्मक क्रियापदें होत.

☞ या नियमास कांहीं बाध आहेत; तें मराठी व्याकरण चंद्रिकेंत पहावे.

## व्याकरण पाठ १ ला. (१--१५)

प्रश्न:--धातु कशास ह्मणतात? क्रियापद कसें होतें? क्रियापदाच्या जाति किती? व त्या कोणत्या? कर्त्ता म्हणजे काय? कर्म म्हणजे काय? कर्त्ता कोणत्या विभक्तींत असतो? कर्म कोणत्या विभक्तींत असतें? कोणत्या प्रश्नावरून कर्त्ता समजतो? व कोणत्या प्रश्नावरून कर्म समजतें? सकर्मक क्रियापद म्हणजे काय? त्यावरून कोणते प्रयोग होतात? अकर्मक

क्रियापद ह्मणजे काय ? त्यावरून कोणते प्रयोग होतात ? उभयविध क्रियापद म्हणजे काय ? सकर्मक व अकर्मक क्रियापद ओळखण्याची सोपी रीत कोणती ?

पुढील वाक्यांतील **कर्त्ता, कर्म,** आणि **क्रियापदें** आणि त्यांच्या **जाति** व **धातु** सांगाः—

रामा पुस्तक वाचितो. गोविंदा आला. रामचंद्र गेला. नारायण बसला. मीं पुस्तक फाडिलें. त्यानें गाडी मोडिली. रामानें रावणास मारिलें. रामानें सेतु बांधिला. मारुतीनें लंका जाळिली. त्यानें शिकविलें. तुम्हीं अंकगणित शिकावें. त्याचें घर मोडलें. त्यानें घर मोडलें.

पुढील वाक्यांत **कर्त्ते, कर्मे,** आणि क्रियापदें घालाः—

रामा —फाडितो.—आला.—पुस्तक वाचितो. कृष्णा—वाचितो.त्यानें पुस्तक—.गोविंदानें गाडी—.मारुतीनें लंका—. वाल्मिकानें रामायण—.रामानें—बांधिला. त्यानें—विचारिलें. रामचंद्रानें चंद्रिका—.

पुढील **क्रियापदें** कोणतींः—करील, मारील, नेईल, लिहील, वाचील, फाडीलः येईल*,जाईल*. बसेल तरेल, मरेल, संपेल, खपेल, जपेल, लपेल, भांडेलः शिकेल*, चरेल*.

* मराठी व्याकरण चंद्रिका पहा.

१६ जेथें कर्त्ता निराळा नसून क्रियेचा भाव तोच कर्त्ता मानतात तेथें **भावकर्तृक** क्रियापद जाणावें; जसेंः—उजडतें कळमळतें, सांजावलें, फांवलें, वाटलें, इ०.

भा-शा-२२



☞ टीप भावकर्तृक क्रियापदावरून भावकर्तरि प्रयोग होतो. भावकर्तृक क्रियापद निरंतर तृतीयपुरुषीं एकवचनीं नपुंसक लिंगीं असतें.

१७ जें क्रियापद दुसऱ्या धातूंच्या रूपांशीं योजिलें असतां त्यांचा काळ व अर्थ फिरवितें तें **सहाय** क्रियापद:— अस, नस, हो, जा, ये, दे, लाग, बस, पाहिजे, नको, नये, नलगे, इ० सहाय क्रियापदें.

१८ कर्त्ता दुसऱ्याकडून क्रिया करवितो असा अर्थ ज्यावरून निघतो तें **प्रयोज्य** क्रियापद; जसें:—बांधवतो, बांधवितो; करवतो, करवितो; देववतो; लिहवतो; इ०.

टीप--अनेकाक्षरी धातूस अव किंवा ईव प्रत्यय लाविल्यानें प्रयोज्य क्रियापद होतें; जसें:--बांध + अव = बांधव. कर + ईव = करीव. उदाहरण-बांधवतो; करीवतो. एकाक्षरी किंवा हकारांत धातूस वव किंवा वीव प्रत्यय लाविल्यानें **प्रयोज्य** क्रियापद होतें; जसें:--दे + वव = देवव. दे + वीव = देवीव. लिह + वव = लिहवव. लिह + वीव = लिहवीव. उदाहरण-देववतो, देववितो; लिहवतो, लिहविवतो.

☞ प्रयोज्य क्रियापदावरून प्रयोज्य भेद होतो.

१९ क्रिया करण्याची शक्ति कर्त्याला आहे असा अर्थ ज्या क्रियापदावरून निघतो तें **शक्य** क्रियापद; जसें:—बांधवत, करवतें, जाववतें, इ०.

टीप--अनेकाक्षरी धातूस 'व' हा प्रत्यय आणि एकाक्षरी

धातूस 'वव' हा प्रत्यय लाविल्यानें शक्य क्रियापद होतें; जसें:-- बांध + व + तें = बांधवतें; जा + वव + तें = जाववतें.

☞ शक्य क्रियापदावरून शक्य भेद होतो.

२० सहाय क्रियापदांपैकीं ज्यांचीं रूपें केवळ नियमित अर्थीं, नियमित काळीं, व नियमित पुरुषीं होतात, तीं **गौण** अथवा **सिद्ध** क्रियापदें; तीं--नये, नलगे, पाहिजे, नको, हवें, अशीं पांच आहेत.

☞ विशेष माहिती करितां मराठी व्याकरणचंद्रिका पहावी.

२१ क्रियापदास **रूप, भेद, अर्थ, काळ, पुरुष, लिंग, वचन,** आणि **प्रयोग** हीं लागतात.

### व्याकरण पाठ २ रा. ( १६--२१ )

भावकर्तृक क्रियापद म्हणजे काय? त्याचीं उदाहरणें सांगा. त्यावरून कोणता प्रयोग होतो? व तें क्रियापद निरंतर कसें असतें? सहाय क्रियापद ह्मणजे काय? त्याचीं उदाहरणें सांगा. प्रयोज्य क्रियापद म्हणजे काय? त्याचे प्रत्यय कोणते? व त्यावरून कोणता प्रयोग होतो? शक्य क्रियापद ह्मणजे काय? त्याचे प्रत्यय सांगा? व त्यावरून कोणता भेद होतो? गौण अ० सिद्ध क्रियापद म्हणजे काय? गौण अ० सिद्ध क्रियापदें कोणतीं? क्रियापदास काय काय लागतें?

सांजावलें, फांवलें, उजाडतें, कळमळतें, हीं कोणतीं क्रियापदें? अस, नस, हो, जा, ये, दे, लाग, बस, पाहिजे, नको, नये, नलगे, हीं कोणतीं क्रियापदें? बांधवितो, करवितो, नेववितो, खाववितो, हीं कोणतीं क्रियापदें? त्यांचीं कारणें सांगा. बांधवतें, करवतें, जाववतें, खाववतें, लिहवतें, हीं कोणतीं क्रियापदें?

## रूपविचार.

२२ रूपें दोन आहेतः-करणरूप आणि अकरणरूप.

२३ क्रियापदावरून आहे असा अर्थ निघतो त्यास करणरूप ह्मणतात; जसें:—आहे, होता, इ०.

२४ क्रियापदावरून नाहीं असा अर्थ निघतो त्यास अकरणरूप म्हणतात; जसें:— नाहीं, नव्हता, इ०.

## भेदविचार.

२५ भेद तीन आहेत:—मूळरूपभेद, प्रयोज्यभेद आणि शक्यभेद.

२६ जेथें कर्त्ता स्वतः क्रिया करतो तेथें मूळरूप भेद जाणावा; जसें:-मी करितों, तो जातो इ०.

२७ जेथें कर्त्ता दुसऱ्याकडून क्रिया करवितो तेथें प्रयोज्य भेद जाणावा; जसें:-करवितो, मारवितो, इ०.

टीप—प्रयोज्य भेद प्रयोज्य क्रियापदावरून होतो.

२८ जेथें क्रिया करण्याची शक्ति कर्त्याचे आंगीं असते तेथें शक्यभेद जाणावा; जसें:—करवतें, जाववतें, इ०.

टीप—शक्य भेद शक्य क्रियापदावरून होतो.

### व्याकरण पाठ ३ रा. ( २२—२८ )

रूपें किती ? व कोणतीं ? करण रूप ह्मणजे काय ? अकरण रूप ह्मणजे काय ? भेद किती ? व कोणते ? मूळरूप भेद कशास म्हणतात ? प्रयोज्य भेद ह्मणजे काय ? शक्य भेद म्हणजे काय ? प्रयोज्य व शक्य हे भेद कोणत्या क्रियापदांपासून होतात ?

पुढील वाक्यांतल्या क्रियापदांचीं रूपें, व भेद सांगाः—मी आलों. तो गेला. तो जातो. तो निजेल. ती गेली नव्हती. ती निजली नाहीं. त्यानें वाचलें नसेल. मी करवितो. तो नेववितो. तो करवीत नाहीं. मी नेववीत नाहीं. माझ्यानें करवतें. माझ्याच्यानें नेववतें.

## अर्थविचार.

२९ कर्त्याच्या मनांतील क्रियेचा व्यापार ज्यावरून कळतो तो **अर्थ**.

३० अर्थ **पांच** आहेतः—**स्वार्थ, आज्ञार्थ,** विध्यर्थ, **संकेतार्थ,** आणि **संशयार्थ.**

३१ जेथें बोलणारा एखादी गोष्ट होय किंवा नाहीं सांगतो तेथें **स्वार्थ** जाणावा; जसेंः—तो करितो, त्यानें केलें, तो करणार नाहीं. इ०.

३२ बोलणारा जेथें आज्ञा, उपदेश, अथवा प्रार्थना करितो तेथें **आज्ञार्थ** जाणावा; जसेंः—रामा, काम कर; मुलांनों, पुस्तक वाचा; आई, लाडू दे.

३३ बोलणाराच्या मनांत आज्ञेचा अर्थ असून, धर्म, शक्यता, योग्यता, मनोरथ इत्यादि अर्थ निघतात तेथें **विध्यर्थ** जाणावा; जसेंः—खरें बोलावें; पाऊस पडावा; दया करावी, चाकरी मिळावी इ०.

**टीप**-क्रियापदाचे शेवटीं **वा, वी, वें,** हे प्रयय आले असतां विध्यर्थ जाणावा.

३४ क्रियापदा वरून संकेताचा ह्मणजे अमुक केलें तर अमुक होईल अशा अटीचा अर्थ निघतो तेथें **संकेतार्थ** जाणावा; जसें:–तो आला तर मी येईन.

**टीप**--संकेतार्थांत जर, तर, किंवा जरी, तरी या उभयान्वयी अव्ययांचा उपयोग होतो.

३५ क्रियापदा वरून जेथें संशयाचा अर्थ निघतो तेथें **संशयार्थ** जाणावा; जसें:–तो गेला असेल.

**टीप**--संशयार्थांत क्रियापदाला अस धातु लागते.

## व्याकरण पाठ ४ था( २९—३५ )

प्रश्न:-अर्थ कशाला ह्मणतात? ते किती? स्वार्थ,आज्ञार्थ,विध्यर्थ, संकेतार्थ, आणि संशयार्थ, म्हणजे काय ? संशयार्थी क्रियापदाच्या रूपाला कोणती धातु लागते. संशयार्थांत कोणत्या उभयान्वयी अव्ययांचा उपयोग होतो?

पुढील वाक्यांतल्या क्रियापदांचे अर्थ सांगा:–रामा घर बांधितो. नारायण पत्र लिहितो. रामा निजला. तूं येतोस. ती आली. तिनें घर बांधिलें. तूं जेव. तूं धडा शीक. तूं व्यापार कर. लंकेस जा. त्वां व्याकरण शिकावें. त्यानें शाळा बांधावी. आह्मीं जेवावें. तो आला तर मी जेवीन. रावणानें सीतेला चोरिलें नसतें तर त्याचा नाश झाला नसता. सरदार पुढें चालला तर शिपाई मागून चालतात. तुम्ही विद्या शिकाल तर विद्वान व्हाल. तो मेहनत करील तर त्याला पांचशें रुपये मिळतील. मुलें जर अभ्यास करतील तर त्यांना शिक्षा मिळणार नाहीं. रामजी गेला असेल. तो पु-

ण्यांत असेल. त्याचें लग्न झालें असेल. रामचंद्र येईल तर बरें आहे. रामचंद्र आला असेल. कृष्णानेंच तें चित्र नाशिलें असेल.

## काळविचार.

३६ क्रिया घडण्याच्या वेळेला **काळ** ह्मणतात.

३७ काळ **तीन** आहेतः—**वर्तमान, भूत,** आणि **भविष्य** काळ.

३८ हल्लीं चालत आहे तो **वर्तमान काळ;** जसें:—मी येतों, तूं जातोस, तो जातो, इ०.

३९ मागें गेला तो **भूतकाळ;** जसें:—मी आलों, तूं आलास, तो आला, इ०.

४० पुढें येणार तो भविष्य काळ; जसें:—मी येईन, तूं येशील, तो येईल, इ०.

४१ वर्तमान काळ **तीन** प्रकारचे आहेतः—**वर्तमान, अपूर्णवर्तमान,** आणि **रीतिवर्तमान.**

मी धरितों................................**वर्तमान.**
मी धरीत आहें किंवा धरितों आहें........**अपूर्णवर्तमान.**
मी धरीत असतों............................**रीतिवर्तमान.**

४२ भूतकाळ **सात** प्रकारचे आहेतः—**भूत, वर्तमानभूत, भूतभूत, अपूर्णभूत, रीतिभूत, पूर्णभूत,** आणि **भविष्यभूत.**

सकर्मक धातूंचीं भूतकाळीं प्रथम आणि द्वितीय पुरुषीं रूपें होत नाहींत; तीं नेहमीं तृतीय पुरुषीं असतात.

सं.भा.व्या
१०



मीं अथवा म्यां धरिलें............................भूत
मीं अथवा म्यां धरिलें आहे..................वर्तमान भूत.
मीं अथवा म्यां धरिलें होतें.........................भूतभूत
मी धरीत होतों.............................अपूर्णभूत.
मी धरीं अथवा धरीत असें......................रीतिभूत.
मी धरिता झालों..............................पूर्णभूत.
मी धरणार होतों........................भविष्यभूत.

४३ भविष्य काळ पांच प्रकारचे आहेतः—भविष्य, अपूर्णभविष्य, वर्तमानभविष्य, भूतभविष्य, आणि भविष्यभविष्य.

मी धरीन ...................................भविष्य.
मी धरीत असेन..........................अपूर्णभविष्य.
मी धरणार आहें......................वर्तमानभविष्य.
मीं अथवा म्यां धरिलें असेल.................भूतभविष्य.
मी धरणार असेन.......................भविष्यभविष्य.

## व्याकरण पाठ ५ वा. ( ३९—४३ )

प्रश्नः–काळ कशाला म्हणतात? ते किती आहेत? वर्तमान काळ ह्मणजे काय ? वर्तमान काळाचे भेद किती? भूतकाळ म्हणजे काय ? भूतकाळाचे भेद किती ? भविष्य काळ म्हणजे काय ? भविष्य काळाचे भेद किती ?

पुढील क्रियापदांचे काळ सांगाः–करितो, जातो, बसतो; करीत आहे, जात आहे, बसत आहे; करीत असतो, जात असतो, बसत असतो. केलें, गेला, बसला; केला आहे, गेला

आहे, बसला आहे; केलें होतें, गेली होती, बसला होत करीत होतों, जात होता, बसत होती; करी अ० करीत असे, जा अ० जात असे, बसे अ० बसत असे; करिता झालों, जाती झाली, बसता झाला; करणार होता, जाणार होतें, बसणा होती. करीन, जाईन, बसेन; करीत असेन, जात असेल, बस असेल; करणार आहे, जाणार आहे, बसणार आहे; के असेल, गेलों असेन, बसलों असेन; करणार असेन, जाण असेन, बसणार असेन.

## वर्तमान काळाचे प्रत्यय.

| पुरुष. | एकवचन | अनेकवचन. |
|---|---|---|
| प्रथम | तों. तें. तों. | तों. |
| द्वितीय | तोस. तेस. तेंस. | तां. |
| तृतीय | तो. ते. तें. | तात. |

| अस धातु. वर्तमानकाळ. १ ला प्रकार. | अस धातु. वर्तमानकाळ. २ रा प्रकार. |
| --- | --- |
| मी असतों. आह्मी असतों. | मी आहें. आह्मी आहों. |
| तूं असतोस. तुम्ही असतां. | तूं आहेस. तुह्मी आहां. |
| तो असतो. ते असतात. | तो आहे. ते आहेत. |

## कर धातु.

### ( १ ) वर्तमानकाळ.

मी करितों. आह्मी करितों.
तूं करितोस. तुह्मी करितां.
तो करितो. ते करितात.

### ( २ ) अपूर्ण वर्तमानकाळ.

मी करीत आहें. आह्मी करीत आहों.
तूं करीत आहेस. तुह्मी करीत आहां.
तो करीत आहे. ते करीत आहेत.

### ( ३ ) रीति वर्तमानकाळ.

मी करीत असतों. आम्ही करीत असतों.
तूं करीत असतोस. तुम्ही करीत असतां.
तो करीत असतो. ते करीत असतात.

## भूतकाळाचे प्रत्यय.

प्रकार १ ला.

| पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम | लों. लें.लों. | लों. |
| द्वितीय | लास.लीस.लेंस | लां. |
| तृतीय | ला. ली. लें. | ले. ल्या.लीं |

प्रकार २ रा.

| पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम | तों. तें. तों. | तों. |
| द्वितीय | तास.तीस.तेंस | तां. |
| तृतीय | ता. ती. तें | ते. त्या.तीं. |

होधातु. भूतकाळ.

मी झालों. आम्ही झालों.
तूं झालास. तुम्ही झालां.
तो झाला. ते झाले.

असधातु, भूतकाळ.

मी होतों. आम्ही होतों.
तूं होतास. तुम्ही होतां.
तो होता. ते होते.

( १ ) भूतकाळ.

मी गेलों. आम्ही गेलों.
तूं गेलास. तुह्मी गेलां.
तो गेला. ते गेले.

( २ ) वर्तमान भूतकाळ.

मी गेलों आहें. आम्ही गेलों आहों.
तूं गेलाआहेस. तुह्मी गेलां आहां.
तो गेला आहे. ते गेले आहेत.

### (३) भूतभूतकाळ.

मी गेलों होतों. आह्मी गेलों होतों.
तूं गेला होतास. तुह्मी गेलां होतां.
तो गेला होता. ते गेले होते.

### (४) अपूर्ण भूतकाळ.

मी जात होतों. आह्मी जात होतों.
तूं जात होतास. तुह्मी जात होतां.
तो जात होता. ते जात होते.

### (५) रीति भूतकाळ.

| | |
|---|---|
| मी जाईं अथवा जात असें. | आह्मी जाऊं अथवा जात असूं. |
| तूं जाईस अथवा जात असेस. | तुह्मी जां अथवा जात असां. |
| तो जाई अथवा जात असे. | ते जात अथवा जात असत. |

### (६) पूर्ण भूतकाळ.

मी जाता झालों. आह्मी जाते झालों.
तूं जाता झालास. तुह्मी जाते झालां.
तो जाता झाला. ते जाते झाले.

### (७) भविष्य भूतकाळ.

मी जाणार होतों. आह्मी जाणार होतों.
तूं जाणार होतास. तुह्मी जाणार होतां.
तो जाणार होता. ते जाणार होते.

## भविष्य काळाचे प्रत्यय.

प्रकार १ ला-

| पुरुष. | एकवचन. | अनेकव० |
|---|---|---|
| प्रथम. | एन. | ऊं. |
| द्वितीय. | शील. | आल. |
| तृतीय. | एल. | तील. |

प्रकार २ रा-

| पुरुष. | एकवचन. | अनकव० |
|---|---|---|
| प्रथम. | ईन. | ऊं. |
| द्वितीय. | शील. | आल. |
| तृतीय. | ईल. | तील. |

अस धातु. भविष्यकाळ.
मी असेन. आह्मी असूं.
तूं असशील. तुम्ही असाल.
तो असेल. ते असतील.

(१) जा धातु. भविष्यकाळ.
मी जाईन. आह्मी जाऊं.
तूं जाशील. तुम्ही जाल.
तो जाईल. ते जातील.

( २ ) अपूर्ण भविष्यकाळ.
मी जात असेन. आह्मी जात असूं.
तूं जात असशील. तुह्मी जात असाल.
तो जात असेल. ते जात असतील.

( ३ ) वर्तमान भविष्य.
मी जाणार आहें. आह्मी जाणार आहों.
तूं जाणार आहेस. तुम्ही जाणार आहां.
तो जाणार आहे. ते जाणार आहेत.

( ४ ) भूत भविष्य.

मी गेलों असेन. आह्मी गेलों असूं.
तूं गेला असशील. तुह्मी गेलां असाल.
तो गेला असेल. ते गेले असतील.

( ९ ) भविष्य भविष्य.

मी जाणार असेन. आम्ही जाणार असूं.
तूं जाणार असशील. तुह्मी जाणार असाल.
तो जाणार असेल. ते जाणार असतील.

### कृदंतें.

४४ धातूं वरून नामें, विशेषणें आणि अव्ययें साधतात त्यांस धातुसाधितें अथवा कृदंतें ह्मणतात.

### नामें आणि विशेषणें.

| | |
|---|---|
| नेणें..................क्रियावाचक. | नेला, नेलेला, कर्मवाचक. |
| नेता, नेणार, नेणारा,..कर्तृवाचक. | |

### अव्ययें.

नेत, नेतां, नेतांना......................वर्तमानकालवाचक.
नेत असतां, नेत असतांना....अपूर्णवर्तमानकालवाचक.
नेला, नेला असतां, नेला असतांना.,....भूतकालवाचक.
नेऊन...............................भूतभूत कालवाचक.
नेऊं...................................भविष्यकालवाचक.
न्यावें, न्यायाचें, न्यावयाचें.....................विधिवाचक.

टीप--कृदंताच्या मागें न हें अव्यय लाविलें असतां अकरण-रूपीं कृदंतें होतात.

## व्याकरण पाठ ६ वा. (४४)

प्रश्नः--धातु साधितें म्हणजे काय? धातु साधिताचें दुसरें नांव काय? क्रियावाचक, कर्तृवाचक, व कर्मवाचक कृदंतांचीं उदाहरणें सांगा. वर्तमानकालवाचक, अपूर्ण वर्तमानकालवाचक, भूतकालवाचक, भूतभूतकालवाचक, भविष्यकालवाचक, आणि विधिवाचक, या सर्व कृदंतांचीं उदाहरणें सांगा. अकरणरूपी कृदंतें बनविण्याकरितां कृदंतांच्या मागें कोणतें अव्यय लावावें ?

पुढील वाक्यांतील कृदंतें किंवा धातुसाधितें सांगाः—तुला नेणें असेल तर ने. तूं तें पुस्तक नेणार आहेस. पतंग उचलून नेलेला आहे. मी तें पुस्तक नेत होतों. तो तें पुस्तक नेतां नेतां थकला. तें वांसरू जातांना हंबरतें परंतु येतांना हंबरत नाहीं. प्रयागास जातांना वाटेंत नाशिक लागतें. तें पत्र नेलें असतांना चांगलें आहे. मी तें घेऊन आलों. त्याला जाऊन सांगितलें. तें पुस्तक आणून दिलें. मी तें देऊं लागलों होतों. तो तें करूं लागला. न्यावें असें मला वाटलें. न्यावयाचें माझ्या मनांत नव्हतें.

## प्रयोग विचार.

४९. वाक्यांत कर्ता कर्म आणि क्रियेचा भाव यांच्या लिंग, वचनांतून क्रियापदामध्यें जो फेरफार होतो, त्यास प्रयोग म्हणतात.

४६. प्रयोग चार आहेतः— **कर्तरि, कर्मणि, भावे,** आणि **भावकर्तरि.**

४७. कर्त्याच्या लिंगवचनाप्रमाणें जेथें क्रियापदाचें लिंगवचन असतें, तेथें **कर्तरि प्रयोग** जाणावा.

४८ कर्तरि प्रयोगांत **सकर्मककर्तरि,** आणि **अकर्मककर्तरि** असे दोन भेद आहेत.

४९ ज्या कर्तरि प्रयोगांत कर्म असतें तो **सकर्मककर्तरि** प्रयोग जाणावा. जसें:—रामा पुस्तक फाडितो; या वाक्यांत फाडितो हें क्रियापद सकर्मक असून 'पुस्तक' हें त्याचें कर्म होय ह्मणून हा सकर्मककर्तरि प्रयोग होय.

५० ज्या कर्तरि प्रयोगांत कर्म नसतें तो **अकर्मककर्तरि** प्रयोग जाणावा. जसें:—रामा जातो. 'जातो' हें अकर्मक क्रियापद आहे व त्यास कर्म नाहीं ह्मणून हा अकर्मककर्तरि प्रयोग होय.

५१ अकर्मक कर्तरि प्रयोगांत कर्म नसून **कर्ता प्रथमेंत** असतो व सकर्मक कर्तरि प्रयोगांत कर्ता प्रथमेंत असून **कर्म प्रथमेंत** किंवा **द्वितीयेंत** असतें. जसें:—हरी बसतो, राजा रक्षण करितो, गोविंद गोपाळास मारितो, इ०.

## व्याकरण पाठ ७ वा. ( ४५—५१ )

प्रश्नः—प्रयोग म्हणजे काय ? ते किती आहेत? कर्तरि प्रयोग म्हणजे काय? कर्तरि प्रयोगाच्या जाति किती ? सकर्मककर्तरि प्रयोग म्हणजे काय ? अक

मेककर्तरि प्रयोग ह्मणजे काय ? कर्तरि प्रयोगांत कर्ता कोणत्या विभक्तींत असतो ? सकर्मककर्तरि प्रयोगांत कर्म कोणत्या विभक्तींत असतें? सकर्मक. कर्तरि प्रयोगांत कर्म कधीं द्वितीयेंत असतें काय? असल्यास उदाहरण द्या.

पुढील वाक्यांतील प्रयोग सांगाः—रामा पुस्तक वाचितो. मी पत्र लिहितों. तूं पदें ह्मणतोस. तो रामास मारितो. मारोती लंका जाळितो. तो व्याकरण लिहितो. मी भूगोल शिकलों. राजा शिकार करितो. मी जातों. तूं येतोस. तो आला. रामा बसला. चंद्र उगवला. सूर्य मावळेल. मी काकास सांगतों.

९२कर्माच्या लिंगवचनाप्रमाणें जेथें क्रियापदाचें लिंग वचन असतें तेथें कर्मणिप्रयोग जाणावा. जसें:—रामानें छडी मोडिली. यांत छडी हें कर्म स्त्रीलिंगी एकवचनी आहे ह्मणून मोडिली हें क्रियापद स्त्रीलिंगी एकवचनीच आहे.

९३ कर्मणि प्रयोगांत कर्ता तृतीयेंत व कर्म प्रथमेंत असून क्रियापद भूतकाळीं असतें. जसें:—रामानें वाघ मारिला.

९४ कर्मणि प्रयोगाचा कर्मकर्तरि प्रयोग ह्मणून एक भेद आहे. त्यांत कर्ता नसून जें कर्म असतें तेंच वाक्यांत कर्त्याच्या ठिकाणीं येतें; जसें:—वाघ मारिला जातो. पुस्तक फाडिलें गेलें. यांत ‘ वाघ ’ आणि ‘ पुस्तक ’ हीं वास्तविक कर्में असून वाक्यांत कर्त्यांप्रमाणें आहेत.

९५ ज्या प्रयोगांत कर्त्यावरून किंवा कर्मावरून क्रिया-

मराठी ग्रंथ संग्रहालय



पदाचें रूप न फिरतां तें तृतीयपुरुषी, नपुंसकलिंगी, एकवचनी, असतें त्याला भावे प्रयोग ह्मणतात.

९६ भावे प्रयोगाचे दोन भेद आहेतः—**सकर्मकभावे** आणि **अकर्मकभावे.**

९७ अकर्मक भावे प्रयोगांत कर्म नसून **कर्ता तृतीयेंत** असतो. व **सकर्मकभावे** प्रयोगांत कर्ता तृतीयेंत असून कर्म द्वितीयेंत असतें.

९८ ज्या भावे प्रयोगांत **कर्म** नसतें तो **अकर्मकभावे** प्रयोग जसें:—तिनें जावें, गोपाळानें नाचावें. इ०.

टीप--विशेष माहिती करितां मराठी व्याकरण चंद्रिका पहावी.

९९ ज्या भावे प्रयोगांत कर्म असतें तो सकर्मकभावे प्रयोग; जसें:—त्यानें घोड्यास मारिलें, रामानें वाघास धरिलें. इ.

६० ज्या प्रयोगांत क्रियेचा भाव तोच **कर्ता** असतो, व क्रियापद निरंतर **नपुंसकलिंगी एकवचनी** असतें त्याला **भावकर्तरि** प्रयोग ह्मणतात. जसें:—मला कळमळतें, त्याला फावलें इ०.

टीप---भावकर्तृक क्रियापदावरून भावकर्तरिप्रयोग होतो.

### व्याकरणपाठ ८वा ( ५२—६० )

प्रश्न:-कर्माणि प्रयोग म्हणजे काय? कर्मणि प्रयोगांत कर्ता व कर्म कोणत्या विभक्तींत असतें ? कर्मणि प्रयोगाचा एखादा भेद आहे काय ? तो कोणता ? कर्मकर्तरि असें नांव पडण्याचें कारण काय ? क्रियापदाचें लिंग वचन कर्तरि प्रयोगांत कर्त्यावरून, व कर्मणि प्रयोगांत कर्मावरून तसें भावे प्रयो-

गांत कशावरून फिरतें? भावे प्रयोग ह्मणजे काय? भावे प्रयोगांत कर्ता कोणत्या विभक्तींत असतो? भावे प्रयोगाचे भेद किती? ज्यांत कर्म नसतें तो कोणता भावे प्रयोग? व कर्म असतें तो कोणता भावे प्रयोग? कर्मणि, कर्मकर्तरि, सकर्मक भावे आणि अकर्मक भावे या प्रयोगांचीं उदाहरणें सांगा. भावकर्तरि प्रयोग ह्मणजे काय? भावकर्तरिप्रयोगांत क्रियापद कसें असतें? भावकर्तरिप्रयोग कोणत्या क्रियापदावरून होतो?

पुढील प्रयोग सांगाः—रामानें वाघ मारिला. कृष्णानें लेखणी केली. तुम्हीं पागोटें बांधिलें. तांडेलानें गलबत हांकारिलें. पंडितानें संभाषण केलें. साहेबानें पुस्तक दिलें. कुत्र्यानें मांजर खाल्ली. मांजरानें उंदीर मारला. वाघानें कोंकरूं नेलें. स्वारानें घोड्यास मारिलें. रामानें वाघास धरावें. कृष्णानें त्यास बोलाविलें. मीं चंद्रास पाहिलें. नारायणानें गाईस हांकिलें. तिनें यावें. रामानें जावें. राधीनें हंसावें. आनंदीनें वाचावें. माझ्यानें चालवतें. मला कळमळतें. त्याला फावलें. गोपाळास वाटतें.

## अविभक्तिक शब्द विचार.

### क्रियाविशेषण.

६१ **क्रियाविशेषण** कधीं कधीं **विशेषणाचा** किंवा **क्रियाविशेषणाचा** ही गुण दाखवितें. जसें:—तो फार चांगला आहे. तो फार लवकर बोलतो. इ०.

६२गुण विशेषणाचा क्रियाविशेषणाप्रमाणें उपयोग होतो. जसें:—तो चांगलें लिहितो. रामा गोड बोलतो. चांगलें व गोड

हीं गुणविशेषणें आहेत; परंतु अशा ठिकाणीं तीं क्रियाविशेषणें होतात.

६३ क्रियाविशेषण अव्ययें पुढें लिहिल्याप्रमाणें जाणावीं:–,

**कालवाचक**—जेव्हां, केव्हां, एव्हां, शेवटीं, आज, उद्यां, काल, परवां, दरसाल, नेहमीं, इ०

**स्थलवाचक**—तेथें, एथें, जेथें, इकडे, तिकडे, जिकडे कोठें, कोणीकडे, इ०.

**संख्यावाचक**—एकदां, दोनदां, पांचदां, हजारदां, इ०.

**क्रमवाचक**—पहिल्यानें, दुसऱ्यानें, आठव्यानें, इ०.

**निश्चयवाचक**—खचित, खरोखर, निःसंशय, इ०.

**संशयवाचक**—बहुधा, दैवगत्या, प्रायः, कदाचित्, बहुतकरून, इ०.

**स्वीकारवाचक**—बरें, ठीक, हां, खरें, उत्तम, इ०.

**अनुकरणवाचक**—चटकन्, पटदिशीं, गपागप, झटपट, तुरतुर, धाडकन, इ०.

**अभाववाचक**—न, ना, नाहीं, इ०.

**प्रकारवाचक**—बरें, हळू, मोठ्यानें, सपाट्यानें, इ०.

## व्याकरण पाठ १० वा (६१–६३)

प्रश्न:—क्रियाविशेषण क्रियेशिवाय आणखी कशाचा गुण अथवा प्रकार दाखवितें? क्रियाविशेषणाचीं उदाहरणें सांगा. गुणविशेषणाचा क्रियाविशेषणाप्रमाणें उपयोग होतो काय? होत असल्यास उदाहरणें सांगा. क्रियाविशेषणाचे प्रकार सांगा. पुढील क्रियाविशेषणांचीं उदाहरणें सांगा:—

कालवाचक, स्थलवाचक, संख्यावाचक, क्रमवाचक, निश्चयवाचक, संशयवाचक, स्वीकारवाचक, अनुकरणवाचक, अभाववाचक, आणि प्रकारवाचक.

पुढील वाक्यांतील **क्रियाविशेषणें** व त्यांच्या जाति सांगाः-तुम्ही काल आलां. तो परवां जाईल. उद्यां लढाई होणार आहे. दरसाल यात्रा भरते. तो तेथें आहे. मी इकडे आलों. रामा कोठें गेला. कमांडिंग कोणीकडे गेला. आम्ही एकदां व्याकरण शिकलों. रामा पांचदां परीक्षेस गेला. कृष्णा दोनदां खालीं पडला. पहिल्यानें तुम्ही वर गेलां, व दुसऱ्यानें खालीं आलां. तुह्मी खचित बोलतां काय? निःसंशय मी लवकर आलों. मी खचित येईन. तो बहुदां येणार नाहीं. कदाचित् आला तर बहुतकरून मला पत्र लिहील. दैवगत्यां वारा बंद पडला, ह्मणून तें जहाज वांचलें. रामा ह्मणाला, बरें, मी चटकन चापटी मारीन. त्याच्या डोळ्यांतून अश्रू पटपट पडले. त्यानें गपागप गपणे मारिले. ती तुरुतुरु चालते. तें पुस्तक धाडकन आपटलें. तें बरें आहे. तो हळू बोलतो. ती मोठ्यानें चालते. मी झपाव्यानें चाललों.

## उभयान्वयी अव्ययें.

६४ उभयान्वयी अव्ययें पुढें लिहिल्या प्रमाणें जाणावीं:—

**समुच्चयबोधक**—आणि, व, आणखी, इत्यादि, वगैरे, इ०.

**पक्षबोधक**—पण, परंतु, अथवा, अगर, किंवा, नाहीं,

तर, पक्षीं, इत्यादि.

**कारणबोधक**—कांकीं, कारण, ह्मणून, अतएव. इत्यादि.

**संकेतबोधक**—जर, जरीं, यद्यपि, तर, तरी, तथापि, तत्रापि, ह्मणजे, इत्यादि.

**स्वरूपबोधक**—ह्मणून, ह्मणजे, किं, इत्यादि.

## व्याकरणपाठ १० वा. (६४)

**प्रश्नः**—उभयान्वयी अव्ययाचे प्रकार सांगा. समुच्चयबोधक उभयान्वयी अव्ययें कोणतीं? पक्षबोधक उभयान्वयी अव्ययें कोणतीं? कारणबोधक उभायान्वयी अव्ययें कोणतीं? संकेतबोधक उभयान्वयी अव्ययें कोणतीं? आणि स्वरूपबोधक उभयान्वयी अव्ययें कोणतीं?

पुढीलवाक्यांतील **उभयान्वयी अव्ययें** व त्यांच्या जाति सांगाः—तो आणि मी आलों. राम व लक्ष्मण वनवासाला गेले. साखर, गूळ आणखी तेलही आणा. तो आला पण मी कोठें गेलों? ती जेवली परंतु मीं पत्र लिहिलें नाहीं. तो अथवा ती आली असेल. रामा अगर गोविंदा आला तरी चालेल. शिकणारा किंवा शिकविणारा नसला तर शिकणें होणार नाहीं. तूं आलास तर बरें! नाहीं तर मी निघून जाईन. चल त्यापक्षीं माझ्याच घरीं रहा. मी त्यास शिक्षा दिली कांकीं त्यानें मस्ती केली. त्यावर रामानें फिर्याद केली कारण तो त्याला शिव्या देतो. तूं आलास ह्मणून मी जेवलों. मी त्याला समजाविलें अतएव तो समजला. रावणानें जर सीतेला चोरिलें नसतें तर तो

मारला गेला नसता. यद्यपि शुद्धं लोक विरुद्धं नाकरणीयं नाचरणीयं. जरी राजा बलिष्ठ असला तथापि प्रधानांची मति त्यानें विचारिली पाहिजे. मीं दहा रुपये दिले ह्मणजे तुझें काय चालेल? रामा ह्मणून एक मुलगा होता. व्याकरण ह्मणजे काय? मीचार्कि ती राधा.

## शद्बयोगी अव्ययें.

६५ शद्बयोगी अव्ययाचे सविकारक आणि अविकारक असे दोन भेद आहेत.

६६ सविकारक शद्बयोगी अव्यय शद्बाच्यापुढें आलें असतां त्याचें सामान्यरूप होतें. जसें:-घरापुढें, देवळाबाहेर, इ०

६७ अविकारक शद्बयोगी अव्यय शद्बाच्यापुढें आलें असतां त्याचें सामान्यरूप होत नाहीं. जसें:-च, हि, ना, मात्र, देखील, पण, इ०

टीप—अविकारक शब्दयोगी अव्ययांना शुद्धशब्दयोगी अव्ययें म्हणतात. म्हणून च, हि, ना, मात्र, देखील, पण, इत्यादि हीं अविकारक शब्दयोगी अथवा शुद्धशब्दयोगी अव्ययें होत.

## व्याकरणपाठ ११ वा. (६५–६७)

प्रश्न—शब्दयोगी अव्ययाचे प्रकार सांगा. सविकारक शब्दयोगी अव्यय शब्दाचेपुढें आलें तर त्याचें काय होतें? अविकारक शब्दयोगी अव्ययाला दुसरें नांव काय आहे? च, हि, ना, मात्र, देखील, पण, इ० हीं कोणतीं अव्ययें? अविकारक अथवा शुद्धशब्दयोगी अव्ययें शब्दापुढें आलीं असतां त्याचें सामान्यरूप होतें किंवा नाहीं?

पुढील वाक्यांतील शब्दयोगी अव्ययें व त्यांच्या जाति सांगाः– घरामागें कचरा पडला, कामामुळें मला बनलें नाहीं, शाळेपुढें झाडें लाविलीं, जनरल गार्डनच्या मृत्यूविषयीं बातमी पसरल्यावर इंग्लंडांत सर्व लोकांस फार वाईट वाटलें, दाराजवळ एक सुंदर कुत्रा व कुरूप पांखरूं बसलें आहे. तूंचना? मीचतो, तोच आला तर काम होईल, तीही आली तर पुस्तक मिळेल, अकबर हा चांगला बादशाह होता, रामदास देखील देशाचा कल्याणकर्ता होता, तो पण आला होता, रामचंद्र पण महात्मा झाला कृष्ण ही महात्माच होता, मारुती देखील वानर असतां त्यानें कसा पराक्रम केला व आपल्या धन्याची नौकरीही बजाविली तसेंच सर्व करतील तर बरें होईल.

## केवलप्रयोगी अव्ययें.

६८ केवलप्रयोगी अव्ययाचे प्रकार एणेप्रमाणें जाणावेः-

**धिक्कारार्थक**—छत्! छी! थू !ऊः! अः! शिवशिव! इ०

**दुःखार्थक**—ऊँ! अँः!आईआई! अरेरे!इ०

**आश्चर्यार्थक**—वाः!कायमौज! अहाहा! इ०

**धन्यतार्थक**—वाहवा! शाबास! भलें! धन्य! इ०

**अर्जवार्थक**—जी! साहेब! अहो! इ०

**स्तब्धतार्थक**—चुप! गप! चीप! इ०

**वाक्यालंकारी** अथवा **पादपूरणार्थक** } आपला! बेटें! परता ! मग! मातक्यान्! इ०

टीप—कांहीं कांहीं वाक्यांचीं वाक्यें केवलप्रयोगी अव्ययें असतात

## व्याकरण पाठ १२ वा. (६८)

प्रश्नः—केवलप्रयोगी अव्ययाचे प्रकार सांगा. व त्यांचीं उदाहरणें सांगा.

पुढील वाक्यांतील **केवलप्रयोगी अव्ययें** व त्यांच्या जाति सांगाः—वाहवा! किती सुंदर गायन झालें? गाणाराची धन्य! मी शाळेंत जाऊं काय? छत् जाऊं नको! शाबास! लहानपणींच इतके गुण तुझे अंगीं आहेत! अहारे! बिच्याऱ्या पांखरा! अरे बाप! हें केवढें पोट! हा वेड्या! शतमूर्खा! गोपाळा, रामचंद्राशीं प्रीतीनें कां वागत नाहींस? छिः छिः असें करूं नको! मी आपला पायानेंच चालेन! पहावें तें वेटें वाईटच असतें! तूं आलास तर मग कसें? मग तर तुझें समाधान होईल ना! भलेरे नाना भलें!

## सामासिकशद्बविचार.

६९ **सविभक्तिक** आणि **अविभक्तिक** असे शद्बाचे दोन भेद मागें सांगितले; परंतु त्यांशिवाय **सामासिक शद्ब** ह्मणून एक भेद आहे.

७० दोन किंवा अधिक शद्ब एकत्र मिळून जो एक नवीन शद्ब होतो त्यास **सामासिक शद्ब** ह्मणतात.

७१ सामासिक शद्बाचे मुख्य चार प्रकार आहेतः—**तत्पुरुष, बहुव्रीहि, द्वंद्व आणि अव्ययीभाव.**

७२ तत्पुरुषाचा **कर्मधारय** ह्मणून एक भेद आहे;

आणि कर्मधारय समासाचे मध्यमपदलोपी व द्विगु असे दोन भेद आहेत.

७३ सामासिक शब्दांतील पदांचा जो परस्पर संबंध असतो त्यास **समास** ह्मणतात.

७४ सामासिक शब्दांतील पदांचा संबंध लावून दाखविण्याचे रीतीस **विग्रह** ह्मणतात. जसें:—राजवाडा या शब्दांत राज (राजा) आणि वाडा हीं दोन पदें आहेत. त्या दोन पदांचा जो परस्पर संबंध तो समास; व राज+वाडा ह्मणजे "राजाचा जो वाडा तो राजवाडा" अशी जी त्या दोन पदांचा संबंध लावून दाखविण्याची रीति तीस विग्रह ह्मणतात.

## तत्पुरुष समास.

७५ ज्या समासांत दुसरें पद मुख्य असून त्याचा संबंध पहिल्या पदाच्या विभक्तीशीं असतो तो **तत्पुरुष समास**.

७६ तत्पुरुष समासांत प्रथम पदापुढें ज्या विभक्तीचा लोप होतो त्या विभक्तीचें नांव त्या समासास देतात; यावरून तत्पुरुष समासाचे भेद पुढें लिहिल्याप्रमाणें सहा जाणावे:— द्वितीयातत्पुरुष, तृतीयातत्पुरुष, चतुर्थीतत्पुरुष, पंचमीतत्पुरुष, षष्ठीतत्पुरुष, सप्तमीतत्पुरुष.

टीप—मुलांनीं ध्यानांत ठेवावें कीं प्रथमा व संबोधन या विभक्ति आहेत तरी प्रथमा तत्पुरुष किंवा संबोधन तत्पुरुष असे समास होत नाहींत.

७७ या वरील सहा भेदांशिवाय एक **नञ्तत्पुरुष** ह्मणून सातवा भेद आहे. यांत पहिलें पद निषेधार्थी असतें.

टीप:—तत्पुरुष समासाचे भेदांचीं उदाहरणें पुढें दिलीं आहेत:—द्विजदंड=द्विज म्हणजे ब्राम्हण त्याप्रत जो दंड तो द्विजदंड हा द्वितीया-तत्पुरुष समास. गजमोजणी=गजानें जी मोजणी ती गजमोजणी हा तृतीया-तत्पुरुष समास. पोळपाट=पोळीकारितां जो पाट तो पोळपाट हा चतुर्थी-तत्पुरुष समास. कमलोद्भव(कमल + उद्भव)=कमलापासून उद्भवलेलें म्हणजे उत्पन्न झालेलें तें कमलोद्भव हा पंचमीतत्पुरुष समास. राजवाडा=राजाचा जो वाडा तो राजवाडा हा षष्ठीतत्पुरुष समास. वनवास=वनाचे ठायीं जो वास तो वनवास हा सप्तमीतत्पुरुष समास. आतां सातवा प्रकार नञ तत्पुरुष समास:—अनाश्रय ( अन् + आश्रय )=अन् म्हणजे नाहीं जो आश्रय तो अनाश्रय; अज्ञान=अ म्हणजे नाहीं जें ज्ञान तें अज्ञान; अब्राह्मण=अ म्हणजे नाहीं किंवा नव्हे जो ब्राह्मण तो अब्राह्मण.

## व्याकरणपाठ १३ वा ( ६९—७७ )

**प्रश्न**:—शब्दाचे सविभक्तिक आणि अविभक्तिक या दोन भेदांशिवाय आणखी भेद आहे काय? तो कोणता? सामासिक शब्द म्हणजे काय? सामासिक शब्दाचे किती प्रकार आहेत व ते कोणते? तत्पुरुष समासाचा कोणता भेद आहे? कर्मधारय समासाचे किती भेद? व तें कोणते आहेत? समास कशाला म्हणतात? विग्रह कशाला ह्मणतात? राजवाडा या सामासिक शब्दाला विग्रह लावून दाखवा. तत्पुरुष समास म्हणजे काय? तत्पुरुष समासाला विभक्तीवरुन नांवें आहेत काय? तत्पुरुष समासाचे भेद किती आहेत? नञ्तत्पुरुष समास कशावरुन ओळखावा? प्रथमातत्पुरुषाचें व संबोधनतत्पुरुषाचें उदाहरण द्या.

पुढील सामासिक शब्दांचा विग्रह करून त्यांचे समास सांगा:—अंगचोर, द्विजदंड, विप्रताडण, आर्तविमोचन, पर-

पीडा, गंगार्पण, विप्रदान इ०. तोंडपाठ, कृपावलोकन, दयार्द्र, भक्तिवश, द्रव्यसाध्य, गजमोजणी इ०. बाजारवाडा, पोळपाट, जांवई, आग्रह, यज्ञस्तंभ, पूजाद्रव्य, देवघर इ०. पापविमोचन, स्वर्गपतन, भवतारण इ०. केळफूल, हातचाळा, पिंपळपान, राजदरबार, देवपूजा, राजवाडा, इ०. स्वर्गवास, गृहप्रवेश, कर्मकुशल, शास्त्रनिपुण, शिल्पपाटव, इ०. अब्राह्मण, अज्ञान, अनोळखी, अनादर, अनीश्वरवादी अनुपपत्ति, अनेक, अहित, इ०.

यांशिवाय पुढील शब्दांचे ही समास सांगाः—आगलाव्या, घृतपक्व, कंबरमोड्या, पायमळ्या, मानमोड्या, भाजीविक्या, मासखाऊ, व्याजखाऊ, मत्कार्य, मदुद्धरण, मज्जन्म, मट्टीका, मत्तात, मन्मन, मच्छास्त्र, त्वत्सौंदर्य, त्वल्लीला, त्वद्गुण, तच्चरित्र, तद्गौरव, तच्छाखा, तद्रूप, अस्मद्भाग्य, अस्मदपराध, अस्मच्छक्ति, युष्मत्कीर्ति, युष्मदौदार्य, युष्मन्नाम, एतद्देशीय, एतन्मात्र, एतच्छाखीय, स्वजाति, स्वदेश, स्वधर्म, स्वकर्म, स्वहस्त, स्वगोत्र, स्वभाषा, स्वस्थान, निजकार्य, निजगूज, निजधाम, निजतनु, निजमाता, निजधन, आपस्वार्थ, आपसुख, आपबुद्धि, आपमतलब हस्तिदंत, प्राणिमत्सर, इ०

७८ ज्या समासांत पहिलें पद विशेषण किंवा विशेषणरूप असून दुसरें पद नाम किंवा विशेषण ही असतें तो **कर्मधारय समास**. जसें:—तांबडमाती=तांबडी अशी जी माती तीं तांबडमाती. विद्याधन=विद्या हेंच धन. काळपुरुष=काळासारिखा पुरुष. आतेबहीण, मावसभाऊ, चुलतसासरा, इ०

७९ ज्या समासाच्या दोन पदांच्या मधल्या पदाचा लोप होतो तो **मध्यमपदलोपी समास**. जसें:—साखर-

भात—साखरेनें युक्त जो भात तो साखर भात; कातरविडा, घरजांवई इत्यादि.

८० ज्या समासांत पहिलें पद संख्यावाचक असून दुसऱ्या पदांशीं समुच्चयार्थी समास होतो तो **द्विगु समास.** जसें:—चतुर्युग—चार युगांचा समाहार तें चतुर्युग; पंचारती, पंचांग, बारभाई, अठराबाबू, पंचखाजें, इ०

व्याकरणपाठ १४ वा ( ७८—८० )

प्रश्नः—कर्मधारय समास ह्मणजे काय? कर्मधारय समासांत पहिलें पद काय असतें? व दुसरें पद काय असतें? मध्यमपदलोपी समास म्हणजे काय? मध्यमपदलोपी समासांत कशाचा लोप होतो? द्विगु समास म्हणजे काय? कर्मधारय, मध्यमपदलोपी, आणि द्विगु या समासांचीं उदाहरणें सांगा.

पुढील सामासिक शद्बांचा विग्रह करून ते कोणते समास आहेत तें सांगाः—काळपुरुष, ब्रह्मराक्षस, भवसागर संसाराटवी, नीलोत्पल, तांबडमाती, काळमांजर, भोंगळभट, पोकळखर्च, चुलतभाऊ, चुलतसासू, मामेबहीण, मामेसासरा, माऊससासू, आतेबहीण, आजेसासरा, आजेगुरु, नातजांवई, भाचेसून, पणतसासरा, नातसून; साखरभात, कर्वतकीस, लांकूडकाम, कातरविडा, घरजांवई, गर्भश्रीमंत, बाळमित्र; पंचपाळें, पंचारती, पंचखाजें, तीनताल, तीनवार, चारखंड, पांचशेरी, पांचपायली, बाराखडी, बाराक्षरी, अठराटोपी, अठरापगडी ,चतुर्युग, अष्टाध्यायी, साष्टांग.

## बहुव्रीहि समास.

८१ ज्या समासांत दोन पदांचा संबंध असतां तिसऱ्या पदार्थाचा बोध होतो तो **बहुव्रीहि समास**. जसें:—चतुरानन ( चतुर+आनन )=चतुर ह्मणजे चार आहेत ज्याचीं आननें ह्मणजे तोंडें तो चतुरानन ह्मणजे ब्रह्मदेव. चक्रपाणी=चक्र आहे पाणीच्याठायीं ह्मणजे हातीं ज्याच्या तो चक्रपाणि ह्मणजे विष्णु. चतुर्भुज, शशिशेखर, चक्षुश्रवा. इ०

## द्वंद्व समास.

८२ ज्या समासांत दोन किंवा अधिक पदांचा संयोग होऊन मधल्या **आणि** या अव्ययाचा लोप होतो तो **द्वंद्व समास**.

८३ द्वंद्व समासाचे **इतरेतरद्वंद्व** आणि **समाहारद्वंद्व** असे दोन भेद आहेत. नवराबायको, आईबाप, पितापुत्र हा **इतरेतरद्वंद्व समास** होय. यांत पदांच्या अर्थापेक्षां ज्यास्त अर्थ येत नाहीं.

८४ समारहारद्वंद्व समासांत दोन पदांच्या अर्थापेक्षां ज्यास्त अर्थ असतो. जसें:—भाजीपाला—सर्वजातीच्या भाज्या व पाला. हातपाय—यांत हात आणि पाय यांचाच बोध न होतां शरीराच्या इतर भागांचाही बोध होतो. कोळीमाळी, शेठसावकार, घरदार, मीठभाकर, भाकरीबिकरी, दगडगिगड, लहानसहान, इ०.

## अव्ययीभाव समास.

८९ ज्या समासांत पहिलें पद अव्यय असून त्याचा संबंध दुसऱ्या पदांशीं झाला असतां तें सर्व पद क्रियाविशेषण अव्यय होतें तो **अव्ययीभाव समास.** जसें:—दरदिवस, हरघडी, हरवक्त, दरमजल, दररोज, इ०

टीप:—अव्ययीभाव समासाचें सर्वपद क्रियाविशेषण अव्यय असतें.

## व्याकरणपाठ १५ वा ( ८१—८९ )

**प्रश्न:**—बहुव्रीहि समास ह्मणजे काय? द्वंद्व समास म्हणजे काय? द्वंद्व समासांत कोणत्या अव्ययाचा लोप होतो? द्वंद्व समासाचे भेद किती आहेत? व ते कोणते? इतरेतरद्वंद्व व समाहारद्वंद्व समासांचीं उदाहरणें सांगा व त्यांचीं लक्षणें सांगा. अव्ययीभाव समास म्हणजे काय? उदाहरण द्या.

पुढील सामासिक शद्बांचा विग्रहकरून ते कोणते समास आहेत तें सांगा:—चक्रपाणि, शशिशेखर, चतुर्भुज, मृगनयना, लक्ष्मीकांत, उमारमण, एकडोळ्या, बावरओंठचा, उंचमान्या, घोडतोंडचा; आईबाप, बहीणभाऊ, बापलेंक, हातपाय, मातापिता, ब्रह्माविष्णुमहेश, ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्र, आईबापें, दादलाबायलें, बहिणभावंडें, भाजीपाला, कोळीमाळी, शेठसावकार, पानपत्रावळ, घरदार, देवब्राह्मण, शेतमळा, फंदफितूर, दिवाणदरबार, मीठभाकर, पानफूल; दरमजल, दरदिवस, हरघडी, हरवक्त, प्रतिदिवस, प्रतिरात्र, प्रतिवर्ष.

## कारक विचार

८६ वाक्यांत विभक्तींचा क्रियेच्या संबंधानें जो अर्थ निघतो त्यास **कारक** किंवा विभक्तीचा अर्थ ह्मणतात.

८७ प्रथमेचे मुख्य दोन अर्थ असतात. **कर्ता** आणि **कर्म** जसें:—गोविंदा जातो—यांत **गोविंदा** ही प्रथमा व तिचा अर्थ **कर्ता** होय. रामा घर बांधितो---यांत **रामा** ही प्रथमा व तिचा अर्थ **कर्ता** होय; आणि **घर** ही **प्रथमा** व तिचा अर्थ **कर्म** होय.

८८ प्रथमेचा आणखी **उद्देश** ह्मणून तिसरा अर्थ आहे जसें:—गोविंद, गोपाळ, मोरेश्वर, हरी, व चिंतू हे एका सावकाराचे पुत्र होते--यांत गोविंद, गोपाळ, मोरेश्वर, हरी, व चिंतू ह्या प्रथमांचा अर्थ **उद्देश** होय.

**टीप**:—प्रथमेचे कर्ता, कर्म आणि उद्देश यांशिवाय परिमाण आणि अवधि असे अर्थ आहेत जसें:—मी पुष्कळ शहरें फिरलों, परंतु कोठें २० शेर धान्य मिळालें नाहीं. यांत शहरें आणि शेर ह्या प्रथमांचा अर्थ प्रमाण होय. तो सर्व दिवस रडतो—यांत दिवस ह्या प्रथमेचा अर्थ अवधि होय.

८९ द्वितीयेचा अर्थ **कर्म** असतो. जसें रामानें रावणास मारिलें—यांत **रावणास** ही द्वितीया व तिचा अर्थ **कर्म** होय.

## व्याकरण पाठ १६ वा (८६—८९)

**प्रश्न**:—कारक म्हणजे काय? प्रथमेचे मुख्य अर्थ किती आहेत व ते कोणते? आणखी तिसरा एखादा अर्थ आहे काय? त्याचें उदाहरण

सांगा. कर्ता, कर्म, आणि उद्देश यांशिवाय प्रथमेचे आणखी परिमाण आणि अवधि असे अर्थ आहेत काय? त्यांचीं उदाहरणें सांगा. द्वितीयेचे अर्थ किती आहेत? त्याचें उदाहरण सांगा.

पुढील वाक्यांतील विभक्तींचे अर्थ सांगाः—रामा जातो, गोविंदा येतो, यमनी बसते, चंद्र उगवतो, सूर्य मावळतो; रामा गाडी हांकितो, नेपोलियन युद्ध करितो, मी पुस्तक वाचितों, ती पोथी वाचिते, तुह्मी व्याकरण शिकतां, ते लावणी गातात, वानरें फळें तोडतात; मी तुला फळ देतों रामचंद्र रावणास मारितो, सुभेदार शिपायास कैद करितो, शिपाई चोरास धरितो, मांजर उंदरास खातें, कुत्रा मांजरीस खातो, मुंगूस सापास चावतो, साप मनुष्यास डसतो; रामचंद्र हा चांगला मुलगा आहे, गोविंद, विष्णु आणि रामा हे आले, राम दशरथाचा मुलगा होता, शिवाजी अवरंगजेबाचा शत्रु होता, रामा जरी माझा शत्रु आहे तरी तो मला मित्र वाटतो. एक रुपयास २० शेर धान्य मिळेल, पांचशेर भावानें तेल घ्यावें, सातशेर भावानें साखर घेतली, तो पुष्कळ घरें फिरला, त्यानें दोन पायल्या तांदूळ आणले.

९० तृतीयेचे मुख्य अर्थ तीन आहेत--**कर्ता**, **करण**, आणि **सन्निधान**. जसेंः—रामानें जावें—यांत **रामानें** ही तृतीया व तिचा अर्थ **कर्ता** होय. काठीनें मारिलें—यांत **काठीनें** ही तृतीया व तिचा अर्थ **करण** होय. त्यांशीं बोला--यांत **त्यांशीं** ही तृतीया व तिचा अर्थ **सन्निधान** होय.

टीप:—तृतीयेचे 'कर्ता, करण, आणि सन्निधान यांशिवाय' आणखी हेतु, साहित्य, आणि अवधि असे अर्थ आहेत. जसें:—तो गांव दुष्काळानें ओस पडला होता परंतु ईश्वर कृपेनें वांचला. यांत दुष्काळानें आणि कृपेनें या तृतीयेंचा अर्थ हेतु होय. तूं नुसत्या आंगरख्यानें येऊं नको परंतु जामनाम्यानें ये यांत आंगरख्यानें आणि जामनाम्यानें या तृतीयेंचा अर्थ साहित्य. तूं किती वेळानें येशील-यांत वेळानें या तृतीयेचा अर्थ अवधि होय.

## व्याकरणपाठ १७ वा. (९०)

प्रश्नः—तृतीयेचे मुख्य अर्थ किती आहेत? त्यांचीं उदाहरणें सांगा. कर्ता, करण, आणि सन्निधान यांशिवाय आणखी कोणते तृतीयेचे अर्थ आहेत? त्यांचीं उदाहरणें सांगा.

पुढील वाक्यांतील तृतीयेचे अर्थ सांगा:—त्यानें वाचावें, तिनें शिकावें, कृष्णानें मारिलें, मुलानें बोर खाल्लें; कृष्णानें चाकूनें लेखणी केली, पंडितानें लेखणीनें पत्र लिहिलें, शिक्षकानें छडीनें मारिलें, कसावानें सुरीनें गळा कापला; तो रामाशीं बोलतो, मी तुजशीं बोलणार नाहीं, त्याच्याशीं मी कुस्ती खेळेन, आमच्याशीं ते सख्य करतात, महादजी इंग्रेजांशीं लढतो, इंग्रेज राशियाशीं युद्ध करतील. पावसानें माती वाहून गेली, दुष्काळानें गांव ओस पडला, वयानें तो मोठा आहे, शरीरानें तो लठ्ठ आहे, डोळ्यानें ती आंधळी आहे, शरीरानें तो वांकडा आहे, तीनशें स्वारांनिशीं अवरंगजेबानें तो किल्ला घेतला, मी आंगरख्यानें आलों, टोपीनें आल्यास बरें वाटतें, तीनशें लोकांनिशीं मी तेथें गेलों, तो

ही पांचशें स्वारांनिशीं आला होता; तूं किती दिवसांनीं येशील? मी चार मिनिटांनीं येईन, ती दहा दिवसांनीं स्नान करिते, तो चार दिवसांनीं पत्र पाठवितो, सर्व मासिक पुस्तकें महिन्या महिन्यांनीं निघतात, मिलिटरी इन्स्ट्रक्टर आठ आठ दिवसांनीं निघतें.

९१ चतुर्थीचे **संप्रदान** आणि **अधिकरण** असे दोन अर्थ असतात. जसें:—त्याला आंबा दे—यांत **त्याला** ही चतुर्थी व तिचा अर्थ **संप्रदान** होय. पुण्यास गेला—**पुण्यास** ही चतुर्थी व तिचा अर्थ **अधिकरण** होय.

९२ कधीं कधीं चतुर्थीचा अर्थ **कर्ता** होतो. जसें:—रामाला बसवतें-यांत **रामाला** ही चतुर्थी व तिचा अर्थ **कर्ता** होय.

टीप:—चतुर्थीचे संप्रदान, अधिकरण आणि कर्ता यांशिवाय आणखी कारण, प्रयोजन, आणि अवधि असे अर्थ आहेत. जसें:—व्याकरण पाठमाला दोन आण्यांस मिळतें यांत आण्यांस ( आण्यांनीं ) या चतुर्थीचा अर्थ करण होय. गोपाळ फसविण्यास आला. मी कामास जातों. यांत फसविण्यास आणि कामास या चतुर्थीचा अर्थ प्रयोजन होय. तो पुण्यास पहिले तारखेस येतो यांत तारखेस या चतुर्थीचा अर्थ अवधि होय.

## व्याकरणपाठ १८ ( ९१-९२ )

**प्रश्न:**—चतुर्थीचे अर्थ किती आहेत? संप्रदानाचें व अधिकरणाचें उदाहरण सांगा. आणखी चतुर्थीचे अर्थ आहेत काय? ते कोणते? त्यांचीं उदाहरणें सांगा.

पुढील वाक्यांतील चतुर्थीचे अर्थ सांगाः—रामानें त्यास पुस्तक दिलें, कृष्णानें सत्यभामेला फूल दिलें, कृष्णानें सुदामाला सोन्याची नगरी दिली; तो पुण्यास जातो, रामा रात्रीस जेवतो, वाघ दिवसास निजतो, वटवाघूळ रात्रीस फिरतें, परीक्षा मुंबईस होते; त्याला जाववतें, मला खाववेल, त्याला निजवत नाहीं; पांचशें रुपयांला तें घर मिळतें, पावणे चार रुपयांस मिलिटरी इन्स्ट्रक्टर मिळतें, दोन रुपयांस पंडित पुस्तक मिळतें; रामचंद्र फसविण्यास येतो, जवाहिऱ्या कामास जातो, तो बोलण्यास इच्छितो; चवथे तारखेस पगार मिळतो, सातवे तारखेस जावें, दुसऱ्या वर्षास हप्ता मिळेल, पांचव्या महिन्याला आणीन.

९३ पंचमीचा अर्थ **अपादान** असतो. जसें:—पुण्याहून आलों—यांत **पुण्याहून** ही पंचमी व तिचा अर्थ **अपादान** होय.

९४ षष्ठीचा अर्थ **संबंध** असतो. जसें:—रामाचा पुत्र—यांत रामाचा ही **षष्ठी** व तिचा अर्थ **संबंध** होय.

९५ सप्तमीचा अर्थ **अधिकरण** असतो. जसें:—घरांत बसा—यांत **घरांत** ही सप्तमी व तिचा अर्थ **अधिकरण** होय.

## व्याकरणपाठ १९ वा ( ९३—९५ )

**प्रश्न**:—पंचमीचा अर्थ काय? त्याचें उदाहरण सांगा षष्ठीचा अर्थ काय? त्याचें उदाहरण सांगा. सप्तमीचा अर्थ काय? व त्याचें उदाहरण सांगा.

पुढील विभक्तींचे अर्थ सांगाः—मी पुण्याहून येईन, कपाटांतून पुस्तक आण, हांड्यांतून पाणी घे, मुंबईहून रत्नागिरीस जातात, एडनहून इंग्लंडास जातात; रामाचें घर पडलें, विष्णूचें पुस्तक फाटलें, चंद्रीचें कपाळ फुटलें; तो रात्रीं आला, मी घरीं गेलों, ती माजघरांत आहे, रावण लंकेंत राहत होता, विक्तोरिया राणी इंग्लंडांत राहते, उन्हाळ्यांत गवर्नर साहेब महाबळेश्वरीं राहतात.

## हें पुस्तक शिकण्याचे पूर्वीं शुद्ध करावें.

### शुद्धिपत्र.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध | पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २२ | वाटलें | वांटलें | २३ | १८ | १०वा | ९वा |
| १५ | ११ | तू | तूं | २४ | ५ | ५लढाई | लढाई |


## मिलिटरी इन्स्ट्रक्टर.

याचें उत्पन्न अनाथ मुलांच्या संरक्षणाकडे जातें असें हें लोकोपयुक्त वर्तमानपत्र इंग्लिश, हिंदुस्थानी व मराठींत आठ आठ दिवसांनीं प्रसिद्ध होतें. यांत लष्करी सर्व विषय ह्मणजे तारेची खबर, जनरल आरडर, हास्पिटल आसिस्टंट ( डाक्टर ) लोकांच्या बदल्या, मुंबईची ताजी बातमी, परेड कवायतींच्या पुस्तकांचें भाषांतर, व लोकोपयुक्त अनेक गोष्टी प्रसिद्ध होतात. याची वर्षाची किंमत अगाऊ फक्त रु ३–१३ व मागाहून रु. ४–८ आहे. हें वर्तमानपत्र सर्वांनीं घेण्यासारखें आहे कारण त्याच्या उत्पन्नावर ज्यांना आइबापें नाहींत अशा पोरक्या मुलांचा संभाळ होतो. हें पत्र घेतल्यानें स्वार्थ व परमार्थ दोन्ही साधतात. मतलबचा मतलब व परोपकारचा परोपकार. हें पत्र घेणें ह्मणजे अनाथ मुलांस अन्न देणें होय. ह्मणून सूज्ञांनीं त्यास जरूर आश्रय द्यावा.

# नवीन सुधारलेलीं लष्करी पुस्तकें.

## उर्दू आणि देनागरी मध्यें.

१ मार्टिनी हेनरी—रैफल एग्झरसाइज [ सुरूंकेलें. ]
२ " लेकचर. [ सुरूंकेलें. ]
३ " पोझिशन ड्रिल. [ सुरूंकेलें. ]
४ " मस्केट्री रेगुलेशन. [ सुरूंकेलें. ]
५ फील्डएग्झरसाइज ( मार्टिनी मस्केट्री समेत. ) [ सुरूंकेलें. ]
६ सोर्डएग्झरसाइज.
७ मार्करोंका काम ( डयुटीजआफ मार्कर्स. )
८ आटाक फार्मेशन. [ छापत आहे. ]
९ क्यावलरी रेगुलेशन ( रिसाल्याची परेड. ) [ सुरूंझालें. ]
१० लान्सएग्झरसाइज व सोर्ड एग्झरसाइज.
११ मार्टिनी हेनरी मस्केट्रीबद्दल जनरल आर्डर- किंमत बालबोध ६ आणे आाणि उर्दू ८ आणे. पंडित पत्राचे ग्राहकांस अर्धी किंमत.
१२ पिस्तोल रिवाल्वर एग्झरसाइज ( स्नायडर मस्केट्रीचे आल्टरेशनसुद्धां ) किंमत बालबोध ८ आणे, उर्दू १२ आणे. पंडित पत्राचे ग्राहकांस अर्धी किंमत.

हीं पुस्तकें सर्व नवीं तयार करून सुंदर टाइपांनीं चांगले कागदावर छापावलीं आहेत व त्यांचें उत्पन्न बिनवारशीं किंवा अनाथ बालकांच्या संरक्षणाकडे लाविलें जाईल.

बांबे.
१ डिसेंबर १८८५.

गोविंदराव वणवे.
पंडित पत्राचे तंत्री, गिरगाम,-बांबे.

# REVISED AND NEW TRANSLATION
## BOTH IN "BALBODH" AND "URDU,"
*IN THE PRESS.*

1 The Martini Henry—Rifle Exercise (commenced.)
2 ,, Lecture ( ,, )
3 ,, Position Drill ( ,, )
4 ,, Musketry Regulations. ( ,, )
5 The Field Exercise (with Martini Henry Musketry Regulations and the Sword Exercise) (commenced).
6 The Sword Exercise.
7 The Duties of Markers.
8 The Attack Formations. (nearly printed)
9 The Cavalry Regulations. (commenced)
10 The Lance and Sword Exercise.
11 The Matini Henry Musketry. A General Order by H. E. the Commander-in-Chief in india. Ready for Sale. Price Balbodh 6 annas, Urdu 8 annas Post free. To our subscribers half price.
12 Instruction in the use of the Revolver *i. e.* "Pistol. Revolver Exercise." (With Snider Musketry Alterations) Price-Balbodh 8 annas: Urdu 12 annas. Post free. Half price to our subscribers.

The above books have been translated from the latest Editions of 1885. The price of the books will be notified when they are printed.

The translation of the Field Exercise that is being published by us is superior to any other of the sort that has hitherto appeared. Moreover it contains "the Martini Henry—Musketry Instruction. The Adjutants of all the Native Infantry and Cavalry Regiments will kindly let the Manager of the "Pundit" know, at an early date, the number of copies of each publication they require.

*Bombay,*
1st January 1886.

G. WANAVE,
Manager of the "Pundit.
Girgam, Bombay.